# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २०.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :-**

दिनांक १९.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून १४,७६,८३५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून ५,२४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०४२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९६,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :— जिवे ठार मारणारे ०३ आरोपी व ०१ विधीसंघर्षीत बालक ताब्यात.**

दिनांक २०.०५.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, नागपुर—कोराडी सर्व्हीस रोडचे आंत भारत फर्निचर जवळ, कोराडी येथे फिर्यादीचा भाऊ नामे शुभम राजेश बेसरे, वय २८ वर्षे, रा. शिवकृष्णधाम, सेक्टर नं. १५, वॉक्स कुलर मागे, कोराडी, नागपूर हा तसेच, त्याचे सोबत त्याचा मित्र नामे अतुल बलराम ईवनाते, वय २५ वर्षे, रा. शिवकृष्णधाम, सेक्टर नं. १२, वॉक्स कुलर मागे, कोराडी, नागपूर हे घरी जात असता, त्यांचे काही वेळापुर्वी पानठेल्यावर झालेल्या बाचा—बाचीचे कारणावरून आरोपी क्र. १) हर्षल तेजराम नारे, वय २४ वर्षे, रा. जिओ पेट्रोल पंपमागे, दहेगांव, जि. नागपुर २) मयंक मुन्ना मनपे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ८५, गल्ली नं. १०, मिसाळ ले—आऊट, जरीपटका, नागपुर ३) व्यंकटेश विक्रम बडेल, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं. ७७, गल्ली नं. ०५, मिसाळ ले—आऊट, जरीपटका, नागपुर ४) तेजस उर्फ कोला प्रमोद झोडापे, वय २२ वर्षे, रा. तपोवन ले—आऊट, स्मृती नगर, कोराडी, नागपुर ५) प्रिन्स उर्फ तृषीत संजय चावरे, वय २० वर्षे, ६) मोहीत धिरज रामटेके, वय २२ वर्षे, ७) पियुष अतुल डोंगरे, वय २० वर्षे, तिघेही रा. मिसाळ ले—आऊट, जरीपटका, नागपुर तसेच त्यांचा एक विधीसंघर्षीत बालक साथीदार यांनी संगणमत करून, फिर्यादीचे भाऊ व त्याचा मित्र अतुल यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने, दगडाने डोक्यावर मारून व धारदार चाकुसारखे शस्त्राने तसेच, लाकडी दांड्याने वार करून, गंभीर जखमी केले. दोन्ही जखमी यांना उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे भावास तपासुन मृत घोषीत केले. जखमी अतुल यांचा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी सागर राजेश बेसरे, वय ३१ वर्षे, रा. शिवकृष्णधाम, सेक्टर नं. १५, वॉक्स कुलर मागे, कोराडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपींविरूध्द कलम १०३, १०९, १९१(३), १९० भा.न्या.सं., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. कोराडी पोलीसांनी त्वरीत दखल घेवुन, आरोपींचा शोध घेतला व आरोपी क्र. १ ते ३ तसेच, त्यांचा एक साथीदार विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले आहे. ईतर आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १९.०५.२०२६ चे २३.४५ वा. ते दि. २०.०५.२०२६ चे ००.१५ वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, पिपळा फाटा येथे एक १२ चाकी ट्रक क्र. एम.एच. ४० बि.एल. ४४१३ या ट्रकला थांबविण्याचा ईशारा केला असता, ट्रक चालकाने थोड्या अंतरावर ट्रक थांबवुन, तो अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. पंचासमक्ष ट्रकची पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण २९ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. आरोपी ट्रक चालक व ईतर हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून एकुण २९ गोवंशीय जनावरे व १२ चक्का ट्रक वाहन असा एकुण किंमती १६,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना उज्वल गोरक्षण केंद्र, बहादुरा, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

यापकरणी फिर्यादी लोकेश पद्माकर इंगळे, वय ३१ वर्षे, रा. न्यु नरसाळा, स्वागत नगर, हुडकेश्वर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. हनुमंत नकाते यांनी आरोपींविरूध्द कलम ३२५, ३(५) भा.न्या.सं. सहकलम ५(क), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड), ११(१)(ई) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** दिनांक २०.०५.२०२६ चे ०८.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, वाठोडा रिंग रोड, स्मित बार जवळ, रोडचे फुटपाथलगत एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यापकरणी फिर्यादी उदाराम महादेव पाठराबे, वय ७७ वर्षे, रा. वाठोडा रिंग रोड, वाठोडा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. सागर गायकवाड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**